Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education,
Pune S.R.No.832-A, Final Pl No. 178,179,
Near Balchitrawani, Behind Agharkar
Research Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ, स.नं
८३२ अे,फायनल प्लॉट नं,१७८,१७९
बालचित्रवाणीजवळ, आघारकर
रिसर्च इन्स्टिटयुच्या मागे भांबुर्डा,
शिवाजीनगर, पुणे–४११००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000
Email : secretary.stateboard@gmail.com

मंडळातील सेवा निवृत्त / कुटूंब निवृत्ती
वेतनधारकांनी सन २०२३–२०२४ साठी
हयातीचे दाखले सादर करण्याबाबत..

# परिपत्रक

परिपत्रक कमांक:–रा.मं / पेन्शन / हयातीचे दाखले / २०२३–२४ / ८ / ४७३३ दिनांक :– २६ / १० / २०२३

**संदर्भ :–** शासन निर्णय नियम कमांक मकोनी –१००० / प्र.क्र./१८८/ कोषा –प्र.५ दिनांक ०४ / ०३ / २००२.

राज्यमंडळासह सर्व विभागीय मंडळातून सेवानिवृत्त झालेले सेवानिवृत्ती वेतनधारक / कुटूंब निवृत्तीवेतनधारक यांना कळविण्यात येते की, **सन २०२३–२०२४** करिता हयातीचे दाखले सादर करण्याबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. सेवानिवृत्तीधारक व कुटूंब निवृत्तीवेतनधारकांची सविस्तर माहिती असलेली विभाग निहाय, प्रत्येक बॅक व ब्रॅच निहाय दोन याद्या व विहित नमूना सेवानिवृत्ती / कुटूंब निवृत्तीवेतन घेत असलेल्या बॅकेमध्ये ठेवण्यात येत आहेत.

२. प्रत्येक बॅकेत व ब्रॅचमध्ये हयातीच्या दाखल्या संदर्भातील कार्यवाही करण्याबाबतचे परिपत्रक बॅकेच्या नोटीस बोर्डवर डकविण्यात आले आहे, ते कृपया पहावे.

३. बॅकेत जाताना आपले पॅनकार्ड आणि आधारकार्ड सोबत घेवून जावे. बॅकेत गेल्यानंतर तेथे ठेवण्यात आलेला हयातीचा दाखला समक्ष भरुन स्वाक्षरी करावी. आपली स्वाक्षरी झाल्यानंतर त्याचेपुढे बॅकेचे अधिकारी स्वाक्षरी करतील. **आपला हयातीचा दाखलासोबत आधारकार्ड, पॅनकार्डची छायांकित प्रत** बॅकेंतील मंडळाच्या फाईलमध्ये लावण्यात यावी म्हणजे कार्यवाही समाप्त होईल.

४. हयातीचा दाखला सादर करण्याचा कालावधी **दिनांक ०१ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर, २०२३ पर्यंत आहे.** त्यानंतर हयातीचे दाखले बॅकेतून विभागीय मंडळाचा प्रतिनिधी प्राप्त करुन, संबंधितांचे हयातीचे दाखल्याची झेरॉक्स काढून विभागीय मंडळाकडे

ठेवतील आणि **मूळ प्रती** पुढील कार्यवाहीसाठी **०५ डिसेंबर २०२३** पर्यंत राज्य मंडळाकडे सादर करतील.

५. **३० नोव्हेंबर २०२३ पर्यंत** हयातीचा दाखला काही करणास्तव द्यावयाचा राहील्यास, हयातीचा दाखला मंडळाच्या www.mahahscboard.maharashtra.gov.in या वेबसाईट वरुन प्रिंट काढून, दाखला परिपूर्ण भरुन त्यावर राजपत्रित अधिकारी किंवा बॅंक अधिकारी यांची स्वाक्षरी पदनाम शिक्यासह घेऊन राज्य मंडळ कार्यालयाला **दिनांक ०५ डिसेंबर, २०२३ पर्यंत** पोहचेल असा सादर करण्याची जबाबदारी संबंधित सेवानिवृत्तीधारक व कुटूंब निवृत्तीवेतनधारकांची राहील. तसेच **pension.stateboard@gmail.com** या ई–मेल वर व पोस्टाव्दारे सुध्दा परिपूर्ण भरुन पाठवावा.

६. हयातीचे दाखला प्रत मंडळाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

७. सर्व सेवानिवृत्ती वेतनधारक व कुटूंब निवृत्तीवेतनधारक यांना सूचित करण्यात येते की, राज्य मंडळाने या वर्षीसाठी तयार केलेल्या नमुन्यातच हयातीचा दाखला सादर करणे आवश्यक आहे.

८. हयातीच्या दाखल्यासंदर्भात आपणांस काही अडचण किंवा शंका असल्यास राज्य मंडळ, लेखा/पेन्शन शाखा, पुणे – ०४ यांचेशी संपर्क साधावा.
संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक ०२०–२५७०५००० किंवा ०२०–२५७०५१३१ ते १३३

**वरील प्रमाणे सन २०२३–२०२४ साठीच्या हयातीच्या दाखल्याबाबत कार्यवाही करावी. तसेच हयातीच्या दाखल्यासोबत आधारकार्ड व पॅनकार्डची छायांकित प्रत जोडणे अनिवार्य आहे.**

( अनुराधा ओक )
सचिव,
राज्य मंडळ, पुणे – ०४

प्रत माहितीस्तव –
विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे.

# हयातीचा दाखला

दिनांक –

अ. <u>सेवानिवृत्तीवेतनधारक क्रमांक:</u> **P-**

दाखला देण्यात येतो की, मी श्री/श्रीमती ( संपूर्ण नाव ) ---------------------------------- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ ---------------- विभागीय मंडळ मंडळ, ------------- येथून नियत वयोमान/स्वेच्छा सेवानिवृत्त मंडळ अधिकारी / कर्मचारी आहे. माझी जन्मतारीख ------------------ असून, मी दिनांक --------------- रोजी सेवानिवृत्त झालो /झाली आहे. आज दिनांक ------------- रोजी मी हयात आहे.

-------------------

(सेवानिवृत्ती वेतनधारकाची स्वाक्षरी)

ब. <u>कुटूंब निवृत्तीवेतनधारक क्रमांक:</u> **F -**

दाखला देण्यात येतो की, श्री/श्रीमती (संपूर्ण नाव) ---------------------------------------- हे /ह्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, ------------------ येथील कुटूंब निवृत्ती वेतनधारक आहे. माझी जन्मतारीख ------------------- अशी आहे. माझे पती/पत्नी श्री/श्रीमती ---------------------------------------------विभागीय मंडळ, ------------------ येथील मंडळ अधिकारी / कर्मचारी किंवा सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी आहे. तसेच यासोबत पुनर्विवाह न केल्याबाबतचा आणि नियुक्ती व पुनर्नियुक्तीबाबतचा दाखला जोडला आहे. आज दिनांक ----------------------- रोजी मी हयात आहे.

-------------------

( कुटुंब वेतनधारकाची स्वाक्षरी)

सेवा निवृत्ती वेतनधारक / कुटूंब निवृत्ती वेतनधारक यांचा

भ्रमण दूरध्वनी क्र.– किंवा घरचा दूरध्वनी क्र.–

आधार कार्ड क्र. – (छायांकित प्रत जोडणे अनिवार्य )

पॅन कार्ड क्र.– (छायांकित प्रत जोडणे अनिवार्य )

सध्याचा घरचा पत्ता (पिन कोड सह) : ----------------------------------------------------

बॅकेंचे नाव, पत्ता व दूरध्वनी क्रमांक : ----------------------------------------------------

बॅकेचा १० / १४ अंकी पेन्शन खाते क्रमांक -

बॅकेचा **IFSC CODE** -

-------------

(राजपत्रित अधिकारी/बॅक अधिकारी यांची स्वाक्षरी)

पदनाम शिक्यासह

# पुनर्विवाह न केल्याबाबतचा दाखला
## (फक्त कुटुंब निवृत्तीवेतन धारकांसाठी)

कुटुंब निवृत्तीवेतनधारक क्र. एफ--

मी श्री/श्रीमती (पूर्ण नाव) ................................................ असे प्रमाणित करतो/करते की, माझे पती/पत्नी कै. श्री/श्रीमती ............................................ हे/ही महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे/ ............................... विभागीय मंडळ येथील कर्मचारी होते/होती.

मी, आज दिनांक: .......................... रोजी पुनर्विवाह केला आहे / नाही

असल्यास पुनर्विवाहाचा दिनांक ..........................

कुटुंब निवृत्तीवेतनधारकाची स्वाक्षरी. ..............................

पूर्ण नाव व घरचा पत्ता ..........................................
(पिनकोडसह) ..........................................
..........................................

## कुटुंब निवृत्तीवेतनधारक नियुक्ती व पुनर्नियुक्तीबाबतचा दाखला

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती .............................................................. राज्य शासन/केंद्र शासन/स्वायत्त संस्था/खाजगी अनुदानित संस्था/विभागीय मंडळानध्ये नियुक्ती/पुनर्नियुक्ती आहे/नाही (स्पष्ट खुलासा करावा) असल्यास

सदर कार्यालयाचे नाव व पत्ता: .........................................................................................

पदनाम: .........................................................................................

पुनर्नियुक्तीचा दिनांक: .........................................................................................

दिनांक: ..........................................

स्थळ: (कुटुंब निवृत्तीवेतनधारकाची स्वाक्षरी)